## जनरल एज्युकेशन इन्स्टियूटचे

# हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कल्याण (प.)

## (सुभेदार वाडा)

(२ जानेवारी २०१४ ते २ जानेवारी २०१५ शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षे )

## वार्षिक अहवाल- २०१६ - २०१७

दिनांक - २३ /१२ / २०१६

**प्रमुख पाहुणे : मा. श्री. राजीव लक्ष्मण जोशी**

(अध्यक्ष : सार्वजनिक वाचनालय, कल्याण)

**समारंभाचे अध्यक्ष : मा. श्री. पंडित बाबुराव चौघुले**

(शालेय समिती अध्यक्ष : ज.ए.इ.चे हायस्कूल व ज्यु. कॉलेज, कल्याण)

शाळेचे माजी विद्यार्थी, पारितोषिक ठेविदार, या शाळेचे आजी-माजी मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, सन्माननीय निमंत्रित, शाळेतील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी, उपस्थित पालक, बंधु आणि भगिनींनो,

आपल्या हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

### व्यवस्थापन

शाळेच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी सौ. कदम अर्चना धनराज (बी.ए. बी. एड)

उपमुख्याध्यापक पदी - श्री. जे. डी. पारूंडेकर (बी. ए. बी. एड)

पर्यवेक्षक पदावर - १) श्री. ए. एम. मलबारी (बी. ए. बी. एड)

२) श्रीमती एस. ए. बेंद्रे (बी. एस. सी. बी. एड)

हे कार्यरत आहेत तर मुख्यलिपीका म्हणून सौ. व्ही. सी. गरवारे काम पाहतात.

शालेय समितीवर संस्थेने नियुक्त केल्याप्रमाणे संचालक मा. श्री.पंडीत बाबुराव चौघुले हे शालेय समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. तसेच १ जानेवारी २०१६ पासून श्री. ए. एम. मलबारी, श्री. जे. एन. पाटील, श्री. भूषण बी. झोपे, श्रीमती तेजल जयंत उपाध्ये, श्रीमती पुष्पा धस हे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. मा. मुख्याध्यापिका सौ. ए. डी. कदम हे पदसिध्द कार्यवाह म्हणून काम पाहतात.

## बदली पदोन्नती

१) श्रीमती व्ही. पी. इंगळे (बी.एस.सी. बी.एड) मुख्याध्यापिका यांची ल.पो. कन्याशाळा माहिम येथून हायस्कूल कल्याण (सुभेदार वाडा) येथे बदली झाली.

२) श्री. जे. डी. पारूंडेकर (बी.ए.बीएड) यांनी १ जून २०१६ पासून, मुख्याध्यापिका श्रीमती व्ही.पी. इंगळे यांच्या रजेच्या कलावधीत व ३० सप्टेंबर २०१६ अखेरपर्यंत प्रभारी मुख्याध्यापाक म्हणून कार्यभार सांभाळला.

३)१ ऑक्टोबर २०१६ पासून श्रीमती अर्चना धनराज कदम (बी.ए.बी.एड) उपमुख्याध्यापिका प.रा. विद्यालय, भिवंडी येथून पदोन्नतीने आपल्या हायस्कूल कल्याण (सुभेदारवाडा येथे मुख्याध्यापिका म्हणून येऊन कार्यरत आहेत.

४) श्री. बी. एन. शिंदे (बी.ए.बी.एड),श्री. एम. बी. सूर्यंवशी (बी.एस.सी. बी.पी.एड) श्रीमती वाय.व्ही.येवले (बी.एस.सी.बी.एड) (एम.एच.हायस्कुल ठाणे) (प.रा. विद्यालय, भिवंडी) श्री. वा. वि. वारघडे (बी.ए.बी.एड) (एन.आय. उरण) येथून वरील सर्व शिक्षक बदली झाल्यामुळे १ ऑक्टोबर २०१६ पासून आपल्या हायस्कूल, कल्याण या शाळेत सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

## सेवानिवृत्ती

वार्षिक अहवाल वर्षामध्ये प्राचार्य डी.टी.सातपुते, (एम.ए.बी.एड) मुख्याध्यापिका श्रीमती व्ही. पी. इंगळे (बी.एस.सी.बी.एड.) हे सरकारी नियमाप्रमाणे सेवानिवृत्त झाले. तसेच श्री.एम.डी.काळे (बी.कॉम.बी.पी.एड) श्री. ए.पी.सोनार (एम.ए.बी.एड) हे क्रिडाशिक्षक, श्री.चंद्रकांत बा. आवटी सेवक हे सरकारी नियमाप्रमाणे सेवानिवृत्त झाले.

## दुःखद निधन

वार्षिक अहवाल वर्षामध्ये संस्कृत विषयाचे प्रामाणिक, शिस्तप्रिय व विद्यार्थिप्रिय शिक्षक, श्री. सोमण रा.वि., एम. सी.व्ही.सी. विभागाचे विदयार्थी प्रिय शिक्षक श्री. दिपक कंठे सर, विद्यार्थी प्रिय माजी शिक्षिका श्रीमती ताराबाई भिडे, इयत्ता ८ वी, ब मधील विद्यार्थी ओंकार चंद्रकांत पवार यांचे दुःखद निधन झाले.

या सर्व शिक्षकांच्या विद्यार्थ्यांच्या कुंटूंबाच्या दुःखात सुभेदारवाडा शालेय संकूल सहभागी आहे.

## शैक्षणिक

१) फेब्रुवारी/ मार्च २०१६ इयत्ता १२ वी कला शाखेचा निकाल - ८३.८५%
प्रथम क्रमांक कु. सोरे सुश्मिता गणेश - ७५.०७%

२) इयत्ता १२ वी अकाउंटीग व ऑडिटिंग - निकाल ९६.३०%
प्रथम क्रमांक : कु. पाटील मिनाक्षी प्रकाश - ७५.२३%

३) निकाल - ९२%
प्रथम क्रमांक : कुमार तरे दिनेश यशवंत ६८.४८%

ब) मार्च २०१६ इयत्ता १० वी शालान्त परीक्षा निकाल - ९७.९७%

प्रथम क्रमांक - कुमार अनिकेत हेमंत विंचुरकर - ९६.८०%

## नेने ढाल (अक्षीकर स्कॉलर)

संस्थेच्या सर्व शाळांमधील ज्या शाळेची टक्केवारी सर्वाधिक असते त्या शाळेस नेने ढाल ही मानाची ढाल मिळते. २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षातही ही ढाल आपल्या शाळेस मिळाली आहे. २५ सप्टेंबर २०१६ रोजी हा कार्यक्रम आपल्या शाळेत झाला.

## शासकीय चित्रकला परीक्षा

१) सप्टेंबर २०१५ मध्ये झालेल्या चित्रकला परीक्षेचा निकाल.

१) एलिमेंटरी चित्रकला परीक्षा - ९३.९६%

२) इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा - ९२.९५%

२) 'अथर्व ट्रस्ट' डोंबिवली, रंगभरण व चित्रकला स्पर्धेमध्ये ६०० विद्यार्थ्यांचा सहभाग.

३) के.डी.एम.सी तर्फे स्वच्छता अभियानांतर्गत रांगोळी, चित्रकला स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

४) शिवसेना, भाजप कल्याण शहर शाखेतर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग.

५) काळा तलाव महोत्सव चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग.

६) संस्थेच्या, इतर स्थानिक स्पर्धा, सकाळ चित्रकला स्पर्धा, अशा विविध स्पर्धांमध्ये शाळेचे विद्यार्थी सहभाग घेत असतात.

## शैक्षणिक सहली

शैक्षणिक वर्ष २०१६ - २०१७ या वर्षामध्ये खालीलप्रमाणे सहलींचे आयोजन करण्यात आले.

१) इयत्ता ५वी ते ७वी - इमॅजिका खालापूर (२०१५-२०१६)

२) इयत्ता ८ वी ते ९ वी - अलिबाग, नागाव, बिर्लामंदिर (२०१५-२०१६)

३) इयत्ता ७वी ते ९वी - निवासीसहल - प्रथमच विमान प्रवास - ८/१/२०१६ ते १२/१/२०१६ बंगलोर, म्हैसूर, उटी येथे २१ विद्यार्थ्यांचा सहभाग.

४) इयत्ता १० वी वर्षसहल - कल्याणी व्हिलेज.

५) इयत्ता ११ वी, १२वी वर्षासहल - बदलापूर - शांतीसागर

६) इयत्ता ५वी ते ९ वी - सायलेंट वॉटर पार्क - मनोर

## सांस्कृतिक, बहिःशालेय स्पर्धा व वाङ्‌मय मंडळ

१) सांस्कृतिक व स्पर्धासमितीतर्फे या शैक्षणिक वर्षात खालील दिनविशेष वेगवेगळ्या कार्यक्रमांनी स्पर्धांनी साजरे करण्यात आले.

१) १९ जुलै २०१६ - दरवर्षीप्रमाणे गुरूपौर्णिमा उत्सव (व्यासपौर्णिमा) व्यास पौर्णिमेचे महत्व, विद्यार्थ्यांच्या सहभागातून गुरूविषयी कृतज्ञता व्यक्त

२) १ ऑगस्ट २०१६- लोकमान्य टिळक पुण्यतिथी

कै. अप्पा बाहेकर स्मृती स्पर्धांचे आयोजन - हस्ताक्षर स्पर्धा, निबंधस्पर्धा, अत्सफूर्त वक्तृत्व स्पर्धा.

३) श्रावण महिना - कनिष्ठ महाविद्यालय - विद्यार्थिनींसाठी मेहेंदी स्पर्धा.

४) १५ ऑगस्ट २०१६ - स्वातंत्र्य दिन साजरा केला या प्रसंगी समूहगीत गायनस्पर्धा, एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके सादर.

५) ५ सप्टेंबर २०१६ - शिक्षक दिन डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिवस शिक्षक दिनानिमित्त शालेय कामकाज, अध्यापन इयत्ता १० वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांनी केले.

६) स्वच्छ भारत अभियान - निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा, चित्रकला, रांगोळी स्पर्धा, प्रभात फेरी इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले.

७) १४ सप्टेंबर २०१६ - हिन्दी दिन.

८) २५ सप्टेंबर - अक्षीकर दिन - नेने ढाल प्रदान कार्यक्रम.

९) शारदोत्सव - ४ ऑक्टोबर २०१६ शारदापूजन

१०) २ ऑक्टोबर - २०१६ गांधीजयंती, स्वच्छता अभियान

१२) १४ नोव्हेंबर - २०१६- बालदिन.

१३) २६ नोव्हेंबर - २०१६ - संविधान दिन - संविधान रॅली, भारताचे संविधान - उद्देशिका - विद्यार्थ्यांचे वाचन.

१५) ८ मार्च २०१६ - जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

१६) वाङ्‌मय मंडळातर्फे प्रश्नमंजुषाचे आयोजन. तसेच विद्यार्थ्यांच्या वाचन व लेखन कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी तरंग या हस्तलिखिताची निर्मिती.

## क्रीडा विभाग

१) शैक्षणिक वर्ष २०१६ - २०१७ या वर्षामध्ये जिल्हा परिषद ठाणे, कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा, जिल्हास्तरीय क्रीडास्पर्धा, विभागीय क्रीडास्पर्धा, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये कबड्डी, फुटबॉल, क्रिकेट, टेबलटेनिस इत्यादी सारख्या सांघिक खेळामध्ये वर बुध्दिबळ, कराटे, ज्युडो, बॉक्सिंग, कुस्ती, नेमबाजी, तायक्वांदो इत्यादी सारख्या वैयक्तिक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

२) दिनांक १५/१२/२०१६ ते १७/१२/२०१६ - शालेय क्रीडामहोत्सव साजरा केला. या क्रीडामहोत्सवामध्ये कबड्डी, लंगडी, गोळाफेक, डॉजबॉल, चमचा लिंबू, बटाटा शर्यंत अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

## राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्य पातळीवरील खेळाडू

१) कुस्ती - राज्यपातळी - तृतीय क्रमांक

१) महेश अरूण पवार - इ. ११ वी - अ

२) राज्यपातळीवर निवड -
भावेश अनंता जाधव इ. ११ वी - ब

२) **कबड्डी** - १) स्टेट सर्कल कबड्डी असोसिएशन महाराष्ट्र - उत्तम खेळाडू म्हणून निवड.
१) कु. साक्षी संजय गायकवाड
२) विभागीयपातळी - धारावी - कबड्डी लहान गट सहभाग.

३) **जलतरण** - विभागीय पातळीवर सहभाग, राज्यस्तरीय एक्वॉथलान स्पर्धेत द्वितीय क्रमांक, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद.
१) **कु. डॉली देविदास पाटील** - ६वी ड

४) **धावणे व लांबउडी** - १) विभागीय पातळी - दुसरा क्रमांक
१) मानसी कांतीलाल परदेशी - ९वी अ
२) विद्यापीठ मैदानावर झालेल्या स्पर्धा
१) लांब उडी प्रथम क्रमांक, धावणे दुसरा क्रमांक.

५) **कराटे** (मार्शल) -विभागीय पातळी
मयुरेश मुकेश गुजरे - ७वी अ सुवर्णपदक

६) **धावणे** (मॅरेथॉन) - जिल्हा पातळी आठवा क्रमांक,
२) ठाणे महापौर चषक स्पर्धा लांब उडी - तृतीय क्रमांक
कु. तेजस कांतीलाल परदेशी - ६ वी - अ

७) **बॉक्सिंग** - विभागीय पातळी - ब्रॉन्झ पदक.
कु. दर्शन सुनील दळवी इ. ७वी - अ

## बहिःशालेय परीक्षा

**१) गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षा, MTS, NTS डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षा, हिन्दी, इंग्रजी विद्यापीठ परीक्षा, संस्कृत परीक्षा, संस्कृती संवर्धक प्रतिष्ठान- रामायण कथा परीक्षा, या सर्व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असतो व विद्यार्थी या परीक्षांमध्ये घवघवीत यश प्राप्त करतात.**

## विज्ञान विभाग

**१) दरवर्षीप्रमाणे शिक्षणविभागातर्फे होणाऱ्या तालुका पातळीवर भरणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी सहभागी होतात.**
**२) विज्ञान परिषद कल्याण यांच्या मार्फत झालेल्या विज्ञान प्रदर्शनात आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.**
**३) आपल्या जनरल एज्युकेशन संस्थेच्या शतकोत्तर रौप्यमहात्सवामध्ये भरणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात आपल्या शाळेचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.**

## निकाल सुधार विभाग

१) इयत्ता १० वी व १२ वी साठी आठवडी सराव परीक्षा घेतली जाते. प्रत्येकी दोन विषयांचे ३० गुणांचे एकूण ३ संच सोडवून घेतले गेले. सहामाही अभ्यासक्रमावर आधारित संपूर्ण विषयाचा एक संच व संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित संपूर्ण विषयाचा एक संच विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतला.

२) तसेच प्रथम सत्रान्त परीक्षेमध्ये इंग्रजी व गणित याविषयात कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांना रोज एक तास विशेष मार्गदर्शन केले जात आहे.

## N.C.C.

आपल्या शाळेत एन.सी.सी Troop/169 कार्यरत आहे. विशेष म्हणजे एन.सी.सी चे दोन कॅडेट १) पंकज ज्ञानेश्वर पाटील व २) हितेंद्र कैलास पाटील यांची एन.सी.सी. कोट्यातून अनुक्रमे बांद्रा गर्व्हमेंन्ट पॉलिटेक्निक व के.जे. सोमय्या कॉलेज, विद्याविहार येथे निवड झाली. तसेच ८/१२/२०१६ रोजी १० दिवसाचे प्रशिक्षण कोल्हापूर येथे घेऊन आले आहेत.

## स्काऊट - गाईड

सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेत स्काऊट - गाईडचे एकूण ४ युनिट स्थापन करण्यात आले असून एकूण ९९ विद्यार्थी सहभागी झाले आहत.

## विशेष उल्लेखनीय

१) विशेष म्हणजे इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाचा एक भाग म्हणून श्री. विवेक वेलणकर यांचे वेध भविष्याचा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२) कै. दत्तात्रय गणेश पांडे स्मरणार्थ श्री. भरत वासुदेव गोडबोले, रामबाग ४, कल्याण यांनी रूपये २५०००/- इमारत विस्तार प्रकल्पासाठी देणगी रूपाने दिले आहेत.

३) श्री. अनंत गवळी परिवाराने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, सुभेदारवाडा तर्फे रूपये २१,०००/ प्राप्त झालेला पुरस्कार, आपल्या शाळेस देणगी रूपाने दिला.

४) कै. सौ. कुंदा पुरूषोत्तम दाढकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्री. विवेक पुरूषोत्तम दाढकर षष्ठाब्दी पूर्तीनिमित्त रूपये ५०००/- देणगीरूपाने षष्ठाब्दी पूर्ती समिती तर्फे देणगी रूपाने आपल्या शाळेस दिले.

५) इ.६वी अ या वर्गासाठी योगासनाचे वर्ग चालू केले आहेत.

६) स्टेम लर्निंग या संस्थेकडून शाळेस वैज्ञानिक उपकरणांची भेट प्राप्त झाली .

## पालक - शिक्षक संघ

या शाळेत पालक शिक्षक संघ कार्यरत असून पालक-शिक्षक संघाच्या सेभेमध्ये शाळेच्या हिताच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विचारविनिमय करून निर्णय घेतेले जातात.

## भावी योजना

१) माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने - १) ४ था मजला पूर्ण करणे (नविन)
२) ५वी ते १० वीचे वर्ग - ई - लर्निंगने जोडणे.

२) फ्रेंच भाषेचे वर्ग सुरू करणे.

या शाळेवर उदंड प्रेम करणाऱ्या ज्ञात-अज्ञातांचे ऋण निर्देश व्यक्त करून हा अहवाल पूर्ण करीत आहे.

**श्रीमती अर्चना धनराज कदम**
मुख्याध्यापिका